# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ७१७/२०२१/धुळे**

१ श्री. रामेश्वर साहेबराव गोपाळ,
मु.पो.वडाळी नजीक, झाल्टे मळा,
ता.निफाड, जि.नाशिक : तक्रारदार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा,
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),
पोलीस अधीक्षक धुळे यांचे कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, साक्री रोड,
धुळे, ता.जि.धुळे. : प्रतिवादी

**<u>ऑनलाईन सुनावणी दिनांक - ०८/०७/२०२२</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०८/०७/२०२२ रोजी meet.google.com/mcz-qvux-hgn या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २०/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १६५८/२०१८/धुळे, दिनांक ०४/०८/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी." तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपूर्ण स्वरुपात माहिती पुरविली असल्याचे सदर तक्रार अर्जात नमूद केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक १६५८/२०१८/धुळे, दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास दिनांक २७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक १६५८/२०१८/धुळे, दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या

पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना दिनांक २७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि, तक्रारदार यांनी सुनावणीदरम्यान नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीपैकी फक्त ३ इव्हेंटची व्हीडीओ क्लिप अर्धवट स्वरुपात दिली आहे व पेपरची व्हिडीओ क्लिप दिलीच नाही. तसेच सदर माहिती पोलीस अधिक्षक कार्यालयात उपलब्ध आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अपूर्ण माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे, श्री.ईश्वर कातकडे यांनी आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक १६५८/२०१८/धुळे, दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पारीत आदेशास अनुसरुन अपूर्ण माहिती पुरविली. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत तक्रार क्रमांक ७१७/२०२१/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे, ता.जि.धुळे.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.ईश्वर कातकडे (द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी) पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे, ता.जि.धुळे.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.७१७/२०२१/धुळे/ओ- 2029 दिनांक- 20/09/2022